बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये प्रभाग रचना करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले आदेश रद्द करण्याबाबत

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र. २६/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०८/०१/२०१५

वाचा :- १. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का.५,
दि.१६/०८/२०११ व दि.२३/९/२०१४

## आदेश

ज्याअर्थी, सन २०११ चा अध्यादेश क्रमांक १३ (सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२६) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५ मध्ये दुरुस्ती करुन महानगरपालिकांच्या निवडणुकांकरिता बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू करण्यात आली होती. आणि त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार महानगरपालिका क्षेत्राची प्रभागात विभागणी करण्यासंदर्भात उपरोक्त दि. १६/०८/२०११ व दि. २३/०९/२०१४ च्या आदेशान्वये सूचना निर्गमित केल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१८ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्याद्वारे महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागातून केवळ एकच पालिका सदस्य निवडून देण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ मध्ये करण्यात आलेल्या उक्त सुधारणेमुळे राज्य निवडणूक आयोगाने बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्यासंदर्भात निर्गमित केलेले आदेश रद्द करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी, आता याद्वारे राज्य निवडणूक आयोगाने बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये प्रभाग रचना करण्यासंदर्भात दि.१६/०८/२०११ व दि. २३/०९/२०१४ रोजी निर्गमित केलेले आदेश रद्द करण्यात येत आहेत. परिणामी यापुढे महानगरपालिकांची एकसदस्यीय पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्यासंदर्भात आयोगाने यापूर्वी निर्गमित केलेल्या आदेशांमधील सूचनांनुसार महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
महाराष्ट्र

प्रत :-

१. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सर्व महानगरपालिका आयुक्त
३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
४. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
५. मा.राज्य निवडणूक आयुक्तांचे स्वीय सहायक
६. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
७. निवड नस्ती